745

विशेष मागास प्रवर्गाकरिता शासकीय
निमशासकीय सेवेत आरक्षण.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र. बीसीसी-१०९४/प्रक्र. ६८/९४/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक १५ जून १९९५.

पहा :- १. शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. बीसी-१०९४/प्रक्र. ६८/९४-१६ब
दिनांक ८ डिसेंबर १९९४.
२. शासन निर्णय, सा. प्र. वि. क्र. बीसीसी-१०९४/प्रक्र. ६८/
९४/१६-ब, दिनांक २ जानेवारी १९९५.
३. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा
विभाग, क्र. सीबीसी-१४९४/प्रक्र. २३६/मावक-५, दिनांक
७ डिसेंबर १९९४.
४. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा
विभाग क्र. सीबीसी-१४९४/प्रक्र. २३६, मावक-५, दिनांक
१३ जून १९९५.

शासन निर्णय :-

राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेला जनसमुदाय वगळता अन्य काही जाती-जमातीकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेपणाच्या कारणावरुन विशेष सवलती देण्याची मागणी लक्षात घेता समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाच्या शासन निर्णय क्र. सीबीसी-१४९४/प्रक्र. २३६/मावक-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९४ अन्वये खाली नमूद केलेल्या जातींचा "विशेष मागास प्रवर्ग" घोषित केला होता.

| अ. क्र. | जातीचे नांव |
|---|---|
| १. | गोवारी [गवारी] |
| २. | मानर |
| ३. | १. कोष्टी, २. हलबा कोष्टी, ३ हलबा जात ४. साळी, ५. लाड कोष्टी, ६. गढेवाल कोष्टी, ७. देशकर, ८. सालेवार. ९. पद्मशाली, १०. देवांग, ११. कारची बंध, १२. पटवीस. १३. सतसाले, १४. साडे, १५. जैनकोष्टी. |
| ४. | १. कोळी, तत्सम जाती, २. मच्छिमार कोळी, ३. अहिर कोळी ४. खानदेशी कोळी, ५. पानकोळी, ६. ख्रिश्चन कोळी, ७. ढुंबळे कोळी, ८. मानभरे कोळी, ९. सुर्यवंशी कोळी. १०. मांगेला कोळी ११. सोनकोळी, १२. वैती कोळी, १३. खारवी, १४. नाशिक धुळे व जळगांव जिल्हयातील डोंगर कोळी करणारे कोळी. |
| ५. | १. मुन्नेरवार, २. मुन्नुरवार, ३. मुन्नुर, तेलगु मन्नुर, ४. मुन्नुरवार तेलगु, ६. मुन्नरकापू, ७. कापेवार, ८. तेलगु. ९. कापेवार, ९. मुन्नरवाड, १०. तेलगु फुलमाळी या जाती. |

२५६

१९२८८

जिल्हाधिकारी कार्यालय
जालना
5 JUL 1995

कृ. मा. प.

२. त्यास अनुलक्षून या विभागाच्या शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/प्रक्र. ६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर १९९४ अन्वये या "विशेष मागास प्रवर्ग" करिता २% आरक्षण ठेवण्यात आले होते. त्याप्रमाणे हे आदेश शासकीय निमशासकीय तसेच मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका जिल्हापरिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेत देखील लागू राहील असे आदेश या निर्णयाव्दारे देण्यात आले होते. या निर्णयास शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. बीसीसी-१०९४/प्रक्र. ६८/९४-१६-ब, दिनांक २ जानेवारी १९९५ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

३. आता वरील दिनांक २ जानेवारी १९९५ च्या शासन निर्णयाव्दारे देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत आहे. तसेच वरील क्र. ४[१४] येथे उल्लेख केलेल्या "नाशिक, धुळे व जळगांव जिल्हयातील डोंगर शेती करणारे कोळी" या ऐवजी" अनुसूचित जमाती मध्ये समावेश नसलेले कोळी" अशी दुरूस्ती करण्यात येत आहे.

४. वर उल्लेखिलेल्या "विशेष मागास प्रवर्गात" देण्यात आलेले आरक्षण हे सरळ सेवा भरतीसाठी व पदोन्नतीसाठी अनुज्ञेय राहील तसेच या प्रवर्गाला क्रिमिलेअरचे तत्व लागू ~~न~~ राहणार नाही. या प्रवर्गातील ज्या व्यक्तींनी या आधीचअनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय, निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केली आहे, त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये.

५. शासन सेवेतील भरती संदर्भात विहीत करण्यात आलेल्या २०० बिंदु नामावलीमध्ये "विशेष मागास प्रवर्गासाठी" २% आरक्षण दर्शवून सुधारित २०० बिंदु नामावली स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.

६. हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- [श्री. गं. काळे]
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति:

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव/ सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
x प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
x प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई.
x प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे.
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाज कल्याण, पुणे.
आयुक्त, आदिवासी विकास नाशिक.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे. /संचालक, सेवायोजन मुंबई.

x सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
सर्व मंत्रालयीन विभाग.
निवड नस्ती.